*Akshara Multidisciplinary Research Journal*
**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**February 2024**

Special Issue 10 Volume VI

# Recent Trends in Commerce, Management, Economics and Information Technology

*-: Guest Editor: -*
**Dr. Gauri M. Rane**
Principal
Dr. Annasaheb G. D. Bendale Mahila Mahavidyalaya, Jalgaon

*-: Executive Editor: -*

**Dr. Sheela S. Rajput** **Dr. Prashant V. Patil** **Mrs. Sayalee K. Patil**

*-: Associate Editor: -*

**Dr. V. J. Patil** **Dr. P. N. Tayade**

*Akshara Publication*
, Office. Plot.No. 42 Gokuldham Residency Prerana Nagar,Wanjola Road,
Bhusawal Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code :425201

| Sr.No | Title of the Paper | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 43 | Exploring the Macroeconomic Nexus: Evaluating the Interrelationship between Growth of GDP, Exports, & Foreign Exchange Reserves in the Indian Economy | Mr. Kailesh Jaitwar | 188 |
| 44 | An Analytical Study of Social Media Marketing and its Impact on Consumer Behavior in Jalgaon District | Utkarsh Sanjay Punyashil | 194 |
| 45 | Self-Help Groups : - A Tool For Empowering Women and Eradicating Poverty Through Education | Dr. Prashant V. Patil | 198 |
| 46 | Role of social media in the Development of Women Entrepreneur with special reference to Jalgaon city | Mrs. Sayalee Kapil Patil | 203 |
| 47 | A study on the performance of funds management | Mrs. Jui G Narkhede | 209 |
| 48 | Challenges and Opportunity before Maharashtra Sugar Industries Special Reference to North Maharashtra | Dr.Kalyansingh P. Patil | 211 |
| 49 | Study of working life of un-organized sectors employees | Jayant Prabhakar Neve | 213 |
| 50 | भारतातील पर्यटन उद्योग | श्री. मंगेश संतोष किनगे | 216 |
| 51 | भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा अभ्यास | सविता प्रशांत पाटील | 220 |
| 52 | भारतीय ज्ञान प्रणाली | कु. वैष्णवी संतोष वाणी<br>डॉ. सचिन भास्कर कुंभार | 222 |
| | *Abstract* | | |
| 53 | Building Resilience: Self-Help Groups Driving Sustainable Development in Jalgaon City | Ritu Yogesh Salunkhe<br>Tejashri Prakash Chaudhari | 226 |
| 54 | The Service Sector as India's Road to Economic Growth | Gayatri Ashok Bari<br>Harshada Madhukar Patil | 226 |
| 55 | New Education Policy 2020 & Commerce | Neha Milind Khare<br>Komal Dagadu Patil | 227 |
| 56 | Green Marketing: An analytical study on consumer Awareness in Jalgaon District | Rohini Sanjay Patil<br>Jyotsna Ashok Baviskar | 227 |
| 57 | Impact of Technology – Oriented World on Children Development In Jalgaon. District | Maya Pralhad Mahajan<br>Jyotsna Ratan Borse | 227 |
| 58 | Financial Literacy Among Working Women | Priyanka Ganesh Saraf<br>Sakshi Dinesh Bari | 228 |
| 59 | A Study on Consumer Satisfaction of using Mobile E – Wallet at Jalgaon City | Ms. Priyanka A. Chaudhari<br>Ms. Aachal Rajendra Joshi<br>Ms. Jayashri Ravi Hatagale | 228 |
| 60 | A Study on Impact of Social Media on Mental Health Issues | Dhanshri Mahesh Chaudhari<br>Neha Bhaskar Bhalerao | 229 |
| 61 | An Analytical Study of Students Perception Towards E-Learning In Higher Education of Jalgaon District | Dipali Kailas Marathe<br>Jayshri Ajay Bhavsar | 299 |

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / February 2024 / Special Issue 10 / Vol. VI

**50**

# भारतातील पर्यटन उद्योग

**श्री. मंगेश संतोष किनगे**
संशोधक विद्यार्थी
प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे

---

**प्रस्तावना:-**

अतिशय वेगाने विकास करणारा आणि भरपूर उत्पन्न मिळवून देणारा जगातील एक मोठा उद्योग म्हणून पर्यटन उद्योग समोर आलेला असून देशाच्या आर्थिक विकासामध्ये कृषी आणि उद्योग क्षेत्रापेक्षा अधिक योगदान देण्याचे सामर्थ्य या उद्योगामध्ये असल्याचे अनेक अध्यायनातून दिसून आले आहे. पर्यटक हा एखाद्या क्षेत्रास भेट देण्यासाठी आल्यावर तो विविध उपक्रमावर पैसे खर्च करत असतो. जसे कि, निवास, खानपान, वाहतूक, जुगार, खरेदी, पार्क आणि स्मारक प्रवेश शुल्क आणि हेल्थ क्लब इत्यादीवर पर्यटकांची खर्चाची प्रवृत्ती ही मोठ्या प्रमाणावर त्यांचे राष्ट्रीयत्व, उत्पन्न गट, मुक्कामाचा कालावधी इ. वैशिष्ट्यावर निर्धारित असतात. पर्यटकांनी केलेला सर्व खर्च हा गुणक परिणामानुसार सर्व अर्थव्यवस्थेमध्ये भरणा प्रमाणे कार्य करत असतो. त्यामुळे पर्यटन क्षेत्रामध्ये अतिरिक्त उत्पन्न आणि रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत असते. म्हणजेच उद्योग व्यवसायाची भरभराट होऊन उत्पन्न पातळी वाढायला लागली की, त्या क्षेत्रातील खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातून मोठ्या प्रमाणवर गुंतवणूक प्रेरित होते. यालाच अर्थशास्त्रज्ञ 'त्वरक परिणाम' असे म्हणतात. ग्राहकोपयोगी वस्तू, कृषी आणि पशुधन उत्पादने, हस्तकला इत्यादीची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. ही आर्थिक पातळी वाढताना त्यामध्ये काही प्रमाणावर गळतीचीही नोंद केली जाते. जसे आयात, बचत स्वरूपात गळती निश्चित केली जाते.

**पर्यटनाची उत्क्रांती व विकास:-**

पश्चिमी प्रबोधनकाळात पर्यटनाचे उद्दिष्ट्य अधिक मौलिक स्वरूपाचे ठरले. टॉमस कुकने 600 लोकांची लीसेस्टर ते लासबरो अशी रेल्वेसहल आयोजित केली. 1885 च्या पॅरिस प्रदर्शन काळात कुकने लीसेस्टर-कॅले अशा सहली काढल्या व पुढल्याच वर्षी संबंध युरोपची भव्य अशी पहिली वर्तुळाकार सहल यशस्वीपणे घडवून आणली आणि काही वर्षानंतर कुकने मोठ्या प्रमाणात पर्यटक तिकिटे विकण्याचा व्यवसाय सुरू केला. आधुनिक काळातील पर्यटकांच्या वर्गात विविध उद्देशानी प्रवास करणाऱ्यांचा अंतर्भाव होतो. मुख्यतः पर्यटनकाळ हा मर्यादित असतो आठवड्यातील सुट्या रजा तसेच एखाद्या कार्याचा तसेच कार्यक्रमाचा भाग म्हणून नियोजीत कालावधीत पर्यटन केले जाते. अभ्यास वा संशोधन करणे, सदिच्छा भेटीचा घटक म्हणून प्रसिध्द स्थळे पाहणे यासारख्या विविध हेतुनी पर्यटकांची ये-जा चालू असते. आधुनिक अर्थशास्त्रीय परिभाषेत पर्यटक हा सामान्यतः ग्राहक वा उपभोक्ता समजला जातो.

**पर्यटनाचा आर्थिक परीणाम:-**

पर्यटकांचे प्रामुख्याने सहा गटामध्ये वर्गिकरण करता येईल त्यामध्ये राष्ट्रीयत्व, लिंग, वयोगट, उत्पन्नगट, मुक्कामाचा कालावधी आणि प्रवासाची प्रेरणा जे पर्यटन खर्च निश्चित करतात. हे खर्च मुख्यत्वे स्थानिक वाहतुक, रेस्टोरंट आणि बोर्डिंग, निवास, स्मरणिका, मठ तसेच पार्कचे तिकिट आणि किरकोळ पर्यटनाशी संबंधीत सर्व क्रिया पर्यटन उद्योगाअंतर्गत येतात ज्याचे सामान्य कार्य हे पर्यटकांच्या विविध प्रकारच्या गरजांची पुर्तता करणे हे आहे. पर्यटन खर्चापासुन एकूण स्थूल उत्पन्न प्राप्तीत गुणक परिणामानुसार वाढ होताना पहावयास मिळते. या सगळ्यांचा तेथिल पायाभूत-सुविधा, रोजगार, उत्पन्न, कृषी व पशुधन, उत्पादने हस्तकला आणि सेवा क्षेत्रावर परिणाम होतो. याचा पर्यटन क्षेत्रातील आर्थिक विकासावर मोठा परिणाम घडून येतो.

**पर्यटनाची गरज/महत्व:-** देशातील पर्यटन सेवा क्षेत्राची गरज पुढील घटकांतील विकासासाठी आवश्यक ठरते.

**1. उत्पन्न आणि रोजगार निर्मिती--**

जगामध्ये पर्यटन क्षेत्र आर्थिक विकासासाठी नविन असे उद्योग क्षेत्र निर्माण झालेले आहे. उत्पन्न आणि रोजगार निर्मितीसाठी, बेकारी कमी करण्यासाठी हे क्षेत्र महत्वाचे ठरत आहे. पर्यटन उद्योग शासनाला महसुलातून चांगली प्राप्ती मिळवून देत आहे. पर्यटकांच्या सेवा व वस्तू खरेदीवर शासन कर आकारते. त्यामध्ये मद्य, हॉटेल, रूम कर, करमणूक कर, उद्याने आणि इतर प्रवेश शुल्क, व्हिसा शुल्क इत्यादींमधून शासनाच्या उत्पन्नात वाढ होते.

**2. परकीय चलन प्राप्तीचा स्रोत--** विकसीत तसेच विकसनशील देशात पर्यटन हा परकिय चलन प्राप्तीचा महत्वाचा स्रोत आहे. त्याचा देशाच्या व्यवहारतोलातील तूट कमी करण्यासाठी मोठा फायदा होत आहे.

**3. पायाभूत सोयी आणि स्थानिक विकास--** पर्यटन उद्योगाचा ज्या क्षेत्रामध्ये विकास होतो त्या प्रदेशामध्ये पायाभूत सोयी तसेच तेथिल स्थानिक व्यवसायांचा सुध्दा मोठया प्रमाणावर विकास होत असतो.

**जगातील पर्यटन क्षेत्रातील प्रगती:-**

जागतीक पर्यटन संस्थेच्या 'पर्यटन धोरण 2020' मध्ये तीन प्रेरक (E's- Entertainment, Excitement and Education) घटकांचा समावेश आहे. जागतिक ट्रॅव्हल आणि पर्यटन समितीनुसार (WTT) ट्रॅव्हल आणि पर्यटन क्षेत्राचा वाटा 7 युएस ट्रीलीयन डॉलर आहे, जो 2013 मध्ये जागतिक जीडीपीच्या 9.5 टक्के वाढीचा दर पहावयास मिळतो. तर 4.7 द.ल. नविन रोजगार निर्मिती झाली. तर 2021 च्या अहवालानुसार, जगातील एकूण रोजगाराच्या 10.3 % इतका रोजगार पर्यटन क्षेत्रामुळे निर्माण होतो तसेच जागतिक जीडीपीमध्ये 9.6 ट्रीलीयन डॉलरएवढा पर्यटन क्षेत्राचा वाटा आहे.

**तक्ता क्र. 1 आंतरराष्ट्रीय पर्यटन क्षेत्राच्या उत्पन्न - प्राप्तीमध्ये जगातील टॉप 10 देश**

| अ. क्र. | देश | विदेशी पर्यटनातून मिळणारे उत्पन्न (US $ अब्ज मध्ये) | टक्केवारी शेअर |
|---|---|---|---|
| 1 | संयुक्त राज्य | 135.2 | 13.11 |
| 2 | स्पेन | 72.9 | 7.07 |
| 3 | यूके | 68.2 | 6.61 |
| 4 | फ्रान्स | 59.7 | 5.79 |
| 5 | इटली | 44.3 | 4.30 |
| 6 | तुर्की | 41.2 | 4.00 |
| 7 | UAE | _ | _ |
| 8 | जर्मनी | 31.5 | 3.06 |
| 9 | मेक्सिको | 28.0 | 2.72 |
| 10 | कॅनडा | 24.0 | 2.33 |
| | एकुण टॉप 10 देश | 505 | 48.98 |
| | भारत | 21.4 | 2.08 |
| | इतर | 504.6 | 48.94 |
| | एकुण | 1031.0 | 100.00 |

स्रोत: India Tourism Statistics at a Glance 2023, GOI

तक्ता क्र. 1 वरून 2022 मध्ये पर्यटनातून सर्वाधिक उत्पन्न मिळवणाऱ्या टॉप 10 देशांची आकडेवारी दर्शविण्यात आलेली आहे. यावर्षी सर्वाधिक उत्पन्न उत्पन्न संयुक्त राज्य 135.2 US अब्ज डॉलरएवढे मिळाले होते. दुसऱ्या क्रमांकावर स्पेन 72.9 US अब्ज डॉलरएवढे आहे, तर दहाव्या क्रमांकावर कॅनडा 24.0 US अब्ज डॉलरएवढे आहे. जगामध्ये पर्यटनातून सर्वाधिक जास्त उत्पन्न मिळवणारे प्रथम दहा देशांचे उत्पन्न 505 US अब्ज डॉलरएवढे आहे. पर्यटन क्षेत्रातून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नाच्या 48.98 टक्के उत्पन्न या देशांना मिळते, तर इतर देशांचे उत्पन्न 51.02 टक्के एवढे आहे. तर भारताला पर्यटन क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न 21.4 US अब्ज डॉलरएवढे आहे. यावरून असे दिसून येते कि प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात पर्यटन क्षेत्राचा मोठा वाटा असलेला बघायला मिळतो.

**भारतातील पर्यटन क्षेत्रातील प्रगती:-**

पर्यटन हे भारतातील वेगाने विकसीत होणारे आर्थीक क्षेत्र आहे. भारत हा विविधतेने नटलेला व ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेला देश आहे. त्यामुळे भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटन क्षेत्रामध्ये संधी आहेत. त्यामुळेच भारतामध्ये येणाऱ्या आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या जागतिक टक्केवारीमध्ये भारताचा वाटा वाढत असून रँक सुधारत असलेली बघायला मिळते. आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या जागतिक टक्केवारीमध्ये भारताची 2011 मध्ये रँक 38 होती ती 2021 पर्यंत ती रँक 17 पर्यंत आलेली दिसून येते.

**पर्यटकांची संख्या:-**

पर्यटक हा पर्यटन उद्योगासाठी ग्राहक असल्यामुळे पर्यटन उत्पादनाच्या मागणीच्या दृष्टीने पर्यटकांची संख्या ही महत्वाची ठरत असते. कोणत्याही देशातील पर्यटनाचा विकास त्या देशामध्ये किती पर्यटक येतात यावर अवलंबून असतो.

**तक्ता क्र. 2 भारतातील विदेशी पर्यटक भेटीचा तपशील**

| वर्ष | विदेशी पर्यटकांची संख्या (FTAs) (दशलक्ष मध्ये) | अनिवासी भारतीयांचे आगमन (NRIs) (दशलक्ष मध्ये) | आंतरराष्ट्रीय पर्यटक आगमन (ITAs) (दशलक्ष मध्ये) | मागील वर्षांच्या तुलनेत टक्केवारीत बदल | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विदेशी पर्यटकांची संख्या | अनिवासी भारतीयांचे आगमन | आंतरराष्ट्रीय पर्यटक आगमन |
| 2014 | 7.68 | 5.43 | 13.11 | 10.2 | -- | -- |
| 2015 | 8.03 | 5.74 | 13.76 | 4.5 | 5.7 | 5.0 |
| 2016 | 8.80 | 6.22 | 15.03 | 9.7 | 8.5 | 9.2 |
| 2017 | 10.04 | 6.77 | 16.81 | 14.0 | 8.8 | 11.8 |
| 2018 | 10.56 | 6.87 | 17.42 | 5.2 | 1.4 | 3.7 |
| 2019 | 10.93 | 6.98 | 17.91 | 3.5 | 1.7 | 2.8 |
| 2020 | 2.74 | 3.59 | 6.33 | -74.9 | -48.6 | -64.7 |
| 2021 | 1.54 | 5.48 | 7.00 | -44.5 | 52.6 | 10.6 |
| 2022 | 6.19 | — | -- | 305.4 | -- | -- |

स्रोत: India Tourism Statistics at a Glance 2023, GOI

तक्ता क्र. 2 वरून 2014 मध्ये विदेशी पर्यटक भेटीचे प्रमाण 7.68 दशलक्ष होते तर अनिवासी भारतीयांचे पर्यटक भेटीचे प्रमाण 5.43 दशलक्ष होते. भारत सरकारच्या पर्यटन अहवालाप्रमाणे सन 2014 मध्ये 13.11 दशलक्ष विदेशी पर्यटकांनी भारताला भेट दिली. ते 2019 मध्ये विदेशी पर्यटक भेटीचे प्रमाण 10.93 दशलक्ष होते तर अनिवासी भारतीयांचे पर्यटक भेटीचे प्रमाण 6.98 दशलक्ष होते. म्हणजेच सन 2019 पर्यंत त्यामध्ये वाढ होऊन 17.91 दशलक्ष एवढया पर्यटकांनी भारताला भेट दिली. तर 2020 मध्ये जगामध्ये कोविड-19 महामारीचा परिणाम भारतीय पर्यटन उद्योगावर पण मोठ्या प्रमाणात झालेला पाहावयास मिळतो आणि 2020 मध्ये मागील वर्षांच्या तुलनेत टक्केवारीत बदल हा मायनस मध्ये जाऊन -64.7 झालेला पाहावयास मिळतो.

**परकिय चलन प्राप्ती:-**

कोणत्याही प्रकारची उत्पादनाची निर्यात न करता देशाला परकिय चलन मिळवून देणारा पर्यटन हा जगातला एकमात्र उद्योग ठरला आहे. भारताला पर्यटनापासून मिळणाऱ्या परकिय चलन प्राप्तीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. भारतातील पर्यटन सेवा क्षेत्रातील परकिय चलन प्राप्ती संदर्भातील आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. 3 भारतातील पर्यटनातून परकीय चलन प्राप्ती आणि जगातील पर्यटन प्राप्तींमध्ये भारताचा वाटा**

| वर्ष | आंतरराष्ट्रीय पर्यटन प्राप्ती (US $ अब्ज मध्ये) | भारतातील पर्यटनातून परकीय चलन प्राप्ती | | | जगातील पर्यटन प्राप्तींमध्ये भारताचा वाटा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | परकीय चलन प्राप्ती (कोटी रुपयांमध्ये) | मागील वर्षाच्या तुलनेत टक्केवारीत बदल (कोटी रुपयांमध्ये) | परकीय चलन प्राप्ती (US $ अब्ज मध्ये) | वाटा | रँक |
| 2011 | 1042.0 | 83,037 | 25.49 | 17.707 | 1.70 | 18th |
| 2012 | 1117.0 | 95,606 | 15.14 | 17.972 | 1.61 | 16th |
| 2013 | 1198.0 | 1,07,563 | 12.51 | 18.396 | 1.54 | 16th |
| 2014 | 1252.0 | 1,20,366 | 11.90 | 19.699 | 1.57 | 15th |
| 2015 | 1217.0 | 1,34,843 | 12.03 | 21.012 | 1.73 | 14th |
| 2016 | 1246.0 | 1,50,750 | 11.80 | 22.428 | 1.84 | 13th |
| 2017 | 1346.0 | 1,78,189 | 18.20 | 27.365 | 2.03 | 13th |
| 2018 | 1440.0 | 1,95,312 | 9.61 | 28.568 | 1.98 | 13th |
| 2019 | 1494.0 | 2,16,467 | 10.83 | 30.721 | 2.06 | 14th |
| 2020#2 | 559.0 | 50,136 | -76.84 | 6.958 | 1.24 | 13th |
| 2021#2 | 638.0 | 65,070 | 29.79 | 8.797 | 1.38 | 23rd |
| 2022#1 | 1031.0 (P) | 1,34,543 | 106.77 | 16.926 | 1.64 | 14th |

स्रोत: India Tourism Statistics at a Glance 2023, GOI

तक्ता क्र. 3 वरून भारतातील पर्यटन क्षेत्रामार्फत मोठ्या प्रमाणावर देशाला परकिय चलन प्राप्त होत आहे. भारत सरकारच्या पर्यटन अहवालाप्रमाणे सन 2011 मध्ये 83 हजार 37 कोटी रूपये परकिय चलन प्राप्ती झाली होती. त्यामध्ये वाढ होत जावून 2014 मध्ये 1 लाख 20 हजार 366 कोटी रूपये तर 2019 मध्ये 2 लाख 16 हजार 467 कोटी रूपये परकिय चलन प्राप्ती पर्यटन क्षेत्रापासुन प्राप्ती झाली. 2019 मधील पर्यटन क्षेत्रापासुन परकिय चलन प्राप्तीचा मागील वर्षाच्या (%) बदल हा 10.83 टक्के एवढा होता. तर 2020 आणि त्यानंतर त्यामध्ये कोविड-19महामारीचा परिणामामुळे घाट झालेली बघायला मिळते.

**भारतातील राज्य निहाय विदेशी पर्यटकांची संख्या**

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / **February 2024 /** Special Issue 10 / Vol. VI

**तक्ता क्र. 4 भारतातील राज्य निहाय विदेशी पर्यटकांची संख्या दर्शविणारे टॉप 10 राज्य 2022**

| अ. क्र. | राज्य | विदेशी पर्यटकांची संख्या (दशलक्ष) | एकुण पर्यटकांच्या टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | गुजरात | 1.78 | 20.70 |
| 2 | महाराष्ट्र | 1.51 | 17.60 |
| 3 | पश्चिम बंगाल | 1.04 | 12.08 |
| 4 | दिल्ली | 0.82 | 9.50 |
| 5 | उत्तर प्रदेश | 0.65 | 7.56 |
| 6 | तामिळनाडू | 0.41 | 4.74 |
| 7 | राजस्थान | 0.40 | 4.62 |
| 8 | केरळ | 0.35 | 4.02 |
| 9 | पंजाब | 0.33 | 3.84 |
| 10 | मध्य प्रदेश | 0.20 | 2.38 |
| | एकुण टॉप १० | 7.47 | 87.03 |
| | इतर | 1.11 | 12.97 |
| | एकुण | 8.59 | 100.00 |

स्रोत: India Tourism Statistics at a Glance 2023, GOI

तक्ता क्र. 4 वरून 2022 मधील भारतातील राज्यनिहाय विदेशी पर्यटकांची आकडेवारी दर्शवलेली आहे. या दहा राज्यामध्ये 7.47 दशलक्ष पर्यटकांनी भेट दिलेली दिसून येते. त्यातील सर्वाधिक विदेशी पर्यटक येणाऱ्या राज्यामध्ये एक नंबर वर गुजरात असून 1.78 दशलक्ष (एकूण पर्यटकांच्या 20.70 टक्के) विदेशी पर्यटक आलेले आहे. दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र 1.51 दशलक्ष (एकूण पर्यटकांच्या 17.60 टक्के) एवढे आहे. तर इतर राज्यामध्ये 1.11 दशलक्ष (एकूण पर्यटकांच्या 12.97 टक्के) एवढे विदेशी पर्यटक आलेले आहेत. यावरून भारतातील विदेशी पर्यटकांची कोणत्या राज्याला जास्त पसंती आहे हे लक्ष्यात येते तसेच ज्या राज्यमध्ये जास्त पर्यटक भेट देतात त्या राज्याच्या उत्पन्नात वाढ घडून येते.

**सारांश:-** एकूणच, या सर्व विवेचनावरून लक्षात येते की, पर्यटन क्षेत्रामुळे जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होताना दिसून येत आहे. तसेच भारतातील पर्यटनाचा मोठ्या प्रमाणावर विकास होत आहे. भारतातील पर्यटनापासून चलन प्राप्ती, विदेशी पर्यटक भेटी, स्वदेशी पर्यटक भेटी यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसून येत आहे. त्यामुळेच उत्पन्नात व पर्यटन क्षेत्रातील रोजगारामध्ये वाढ होत आहे. परंतु कोविड-19 महामारीचा परिणामामुळे 2019 नंतर या पर्यटकांच्या संख्येमध्ये घट होताना दिसून येत आहे त्याचा परिणाम उत्पन्न, रोजगार, परकीय चलन प्राप्ती यामध्ये सुध्दा घाट होताना दसून येत आहे. जागतिक स्तरावर भारतातील पर्यटन क्षेत्राच्या विकासाला मोठ्या प्रमाणावर संधी आहेत. त्याकरिता भारत सरकार मार्फत 'अतुल्य भारत' सारख्या पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबवल्या जात आहेत.

**संदर्भ:-**

1. Annual Report 2022-23, Ministry of tourism, GOI
2. Economic Survey 2022-23, GOI
3. India Tourism Statistics at a Glance 2023, GOI
4. Thathang Vaiphei, Tourism in Nepal Since 1980: Impact on the Economy, Society and Envirnoment, (PhD. Dessertation) JNU, New Delhi.
5. www.marathivishwakosh.in
6. बॅनर्जी रत्नदीप, (मे-2015), भारतातील पर्यटन क्षेत्राचा आढावा, योजना, पान नं. 26